INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 5.828 (SJIF 2022)

# स्वातंत्र्य सैनिक देशभूषण शितलनाथ जैन

## (Freedom Fighter Deshbhushan Sheetalnath Jain)

**डॉ. मोहन काळकुटे**

इतिहास विभाग प्रमुख
महिला कला महाविद्यालय,
बीड (महाराष्ट्र, भारत)
E-mail: mohankalkute@gmail.com

**DOI No.** 03.2021-11278686 **DOI Link ::** https://doi-ds.org/doilink/04.2022-84763886/IRJHIS2204022

**प्रस्तावना** :

हैद्राबाद संस्थानचा मनमानी कारभार आणि त्यामुळे त्रासलेली जनता, तसेच हिंदू-मुसलमान यांच्यात वाढत गेलेले मतभेद निजामाची हिंदूना मिळाणारी दुय्यम दर्जाची वागणूक, हिंदू धर्मातिल रितीरिवाजांना घातलेली बंदी, त्यामुळे हिंदुच्या दुखावलेल्या भावना, मुस्मील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मिळणारे सहाय्य आणि हिंदु विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर घातलेल्या अटी व सर्व गोष्टींचा परिणाम संपूर्ण हैद्राबाद राज्यातील जनतेवर झाला होता. बीड तालुल्यातील जनताही या प्रकाराने ग्रासली होती. त्यातच भारत देश स्वतंत्र्य झाला. तरीही निजामाने भारतीय संघराज्यात सामील होण्याऐवजी स्वतंत्र्य राहण्याचा घेतलेला निर्णय जनतेच्या विरोधात होता. या सर्व गोष्टीमुळे येथील जनता पेटून उठली आणि मुक्तीची भाषा बोलू लागली.

भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील क्रांतीकारकांचे विचार आणि क्रांतीकारक हैद्राबाद मुक्तीसाठी झटू लागले. बीड तालुक्यातील अनेक क्रांतीकारक या लढ्यामध्ये सामील झाले होते. आपल्या वैयक्तीक सुखापेक्षा हैद्राबाद संस्थान भारतीय संघराज्यात विलीन झालेच पाहिजे असे प्रत्येक क्रांतीकारकाचे ध्येय होते.

**स्वातंत्र्य सैनिक देशभूषण शितलनाथ जैन** :

1) **उद्दिष्ट** : - स्वातंत्र्य सैनिक देशभूषण जैन यांनी हैद्राबाद मुक्ती संग्राम लढ्यात केलेल्या कार्याचा अभ्यास करणे.

2) **विषयाची व्याप्ती** : - स्वातंत्र्य सैनिक देशभूषण जैन यांच्या कालखंडापुरती या शोध निबंधाची व्याप्ती राहिल.

3) **संशोधन पध्दती** : - या शोध निबंधाचे लेखन करण्यासाठी मुलाखत व विश्लेषणात्मक पध्दतीचा वापर करण्यात आला आहे.

स्वातंत्र्य सैनिक देशभूषण जैन यांचा जन्म बीड येथेच दि. 27 फेब्रुवारी 1925 ला झाला. त्यांच्या वडिलांचे नाव शितलनाथ जैन व आईचे नाव मैनाबाई होते. त्यांच्या बाराव्या वर्षी आई मैनाबाई देशभूषणला सोडून देवाघरी निघून गेली तेव्हापासून त्यांचा सांभाळ माय आजीने केला.

देशभूषण जैन मदरे फोकानिया उस्मानिया हायस्कूल, बीड येथे शिकत होते आणि बाहेर निजामाच्या जुल्मी राजवटी उलथून टाकण्यासाठी चळवळी सुरू झाल्या होत्या. काशिनाथ जाधव, रामलिंग स्वामी यांच्या विचारांचा प्रभावही देशभूषण जैनवर पडला होता. म्हणूनच त्यांनी मॅट्रीकच्या वर्गात असतांना निजाम सरकार विरूध्द तरूणामध्ये जागृती निर्माण करायला सुरूवात केली आणि जवळ जवळ 500 विद्यार्थ्यांची संघटना तयार केली. मात्र हि गोष्ट निजाम सरकारच्या कानावर गेल्या बरोबर त्याने शाळेचे मुख्याध्यापक हरिशचंद्रावांवर

दडपण आणून विद्यार्थ्यांकडून माफीनामे लिहून घेतले परंतु 500 पैकी केवळ 07 विद्यार्थ्यांनी माफीनामे लिहून दिले नाही. त्यातील एक विद्यार्थी म्हणजेच देशभूषण जैन होय. परंतु या प्रकरणामुळे त्यांना शाळेतून काढून टाकण्यात आले.

देशभूषणचे वडील शितलनाथ जेबापिंप्रीला शिक्षक होते. त्यांनी मुलाला लढ्यात भाग न घेण्यास सांगितले. परंतु तिथेही ते शांत बसले नाही तर साहेब वरडकर व त्यांचे मावस भाऊ जी. पी. जैन यांचा सहकार्याने त्यांनी तरुणांमध्ये निजाम राजवरी विरूध्द जागृती करण्यात सुरूवात केली. सहा महिन्यानी ते परत बीडला आले. पत्रके काढून ते छापून वाटण्याचे काम त्यांच्यावर सोपविण्यात आले. हि जबाबदारी त्यांनी अगदी गुप्तपणे आणि यशस्वी रित्या पार पाडली.

देशभूषण जैन पाथर्डी कॅम्पशी संबंधीत होते तसेच बालमटाकळी कॅम्पशीही संबंधित होते या दोन्ही कॅम्पला गुप्त बातम्या पोहचविण्याचे जबाबदारीचे काम ते करीत असत. पोलीस ॲक्शनच्या काळात सुध्दा ते पाथर्डी कॅम्पमधेच होते नंतर ते बीडला आले. हैद्राबाद मुक्ती संग्राम संपल्यानंतर 1948 ते 1950 या काळात ते पालीला हेडमास्तर म्हणून राहिले. नंतर या पदाचाही राजीनामा देऊन त्यांनी टायपिंग दुकान टाकले आता ते 93 वर्षाचे आहेत. आज ते बशीरगंज येथे राहत आहेत.

**निष्कर्ष** : -

1) स्वातंत्र्य सैनिक देशभूषण जैन यांनी हैद्राबाद मुक्त संग्राम लढ्यात तरूणपणीच सहभाग घेतला होता.
2) स्वातंत्र्य सैनिक देशभूषण जैन यांच्यावर गोविंदभाई श्रॉफ व काशीनाथ जाधव यांच्या विचारांचा प्रभाव होता.
3) स्वातंत्र्य सैनिक देशभूषण जैन हे पाथर्डी कॅम्पशी संबंधीत होते.

**संदर्भ ग्रंथसूची** :-

1) स्वातंत्र्य सैनिक जैन देशभूषण शितलनाथ, यांची प्रत्यक्ष मुलाखत बशीरगंज, बीड दि. 01 जून 2008.
2) पटेल शंकर भाई, हैद्राबाद मुक्ती संग्राम, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, सन 1993.
3) संपा. श्रोत श्रीनिवास, विर्धे दिगांबर, बीड जिल्ह्यातील स्वातंत्र्य लढा. ऑगस्ट क्रांती सुवर्ण महोत्सव समिती, गांधीभवन, मुंबई सन 1995.
4) संपा. टाकसाळ मनोहर, नाईकवाडे ज्ञानोबा, बिंदूसरेचं पाणी, कॉ. काशिनाथ जाधव गौरव समिती प्रकाशन, बीड दि. 08 मे 1993.